उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर यांच्या अधिपत्याखालील स्त्री रुग्णालय, अहेरी जि. गडचिरोली येथील ४२ अस्थाई पदांना पुढे चालू ठेवण्यास मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांक: अपदे-२०२५/प्र.क्र.३१८/पासु-२

१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
दिनांक: ०८ जुलै, २०२६.

वाचा :-

१) **सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. अपदे-२०२५/प्र.क्र.३१८/पासु-२, दि.१८.११.२०२५**
२) **उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ यांचे पत्र क्र. ब-४/आस्था/ननि/स्त्रीरु अहेरी/१२४६-४७/२०२६, दि.२१.०१.२०२६**
३) **शासन निर्णय ,वित्त विभाग, क्र.पदनि- २०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क., दि.२८.०२.२०२६**

प्रस्तावना:-

उपरोक्त संदर्भाधीन अ.क्र.३ येथील शासन निर्णयान्वये, सर्व प्रशासकीय विभागांना त्यांच्या आकृतीबंधात समाविष्ट असलेल्या अस्थाई पदांना तसेच, यापूर्वी आढावा मंजूर केल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या परंतु, ज्यांचा समावेश आकृतीबंधात करण्यात आलेला नाही, अशा अस्त्वात असलेल्या सर्व अस्थायी पदांना दि.०१.०३.२०२६ ते दि.३१.०८.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. तसेच उपरोक्त संदर्भाधीन अ.क्र.१ येथील शासन निर्णयान्वये उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर यांच्या अधिपत्याखालील स्त्री रुग्णालय, अहेरी जि. गडचिरोली येथील ४२ अस्थाई पदांना दि.१६.०५.२०२५ ते दि.२८.०२.२०२६ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास देण्यात आलेली मुदतवाढ संपुष्टात आल्याने सदर पदांना पुढे चालू ठेवण्यास मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

या शासन निर्णयासोबत जोडलेल्या “परिशिष्ट-अ” मध्ये दर्शविलेल्या उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर यांच्या अधिपत्याखालील स्त्री रुग्णालय, अहेरी जि. गडचिरोली येथील ४२ अस्थाई पदांना दि.०१.०३.२०२६ ते दि.३१.०८.२०२६ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास या शासन निर्णयान्वये मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. सदर अस्थायी पदांचे वेतन पुढील लेखाशिर्षामध्ये खर्ची टाकण्यात यावा आणि हा खर्च सन २०२६-२७ या वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

लेखाशिर्ष
मागणी क्रमांक आर -१ मुख्य लेखाशिर्ष "२२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०१-नागरी आरोग्य सेवा व विषम चिकित्सा, ११०- रुग्णालये व दवाखाने, ११०-७- पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना, (०६)(०१)- मुफसल क्षेत्रातील अध्यापन्नेतर शासकीय रुग्णालये व दवाखाने (२२१० ०२२६)

३. हा शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क., दि.२८.०२.२०२६ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक, पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क., दि.२८.०२.२०२६ अन्वये दि.०१.०३.२०२६ ते दि.३१.०८.२०२६ पर्यंत अस्थाई पदांच्या मुदतवाढीस मान्यता देण्यात आली असली तरी, दरम्यानच्या काळात सुधारीत आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेण्याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी तातडीने प्रस्ताव सादर करण्याबाबत वित्त विभागाने निर्देशित केले आहे. तसेच उपरोक्त संदर्भ क्र.०३ येथील वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसार, अस्थायी पदांना दि.०१.०३.२०२६ ते दि.३१.०८.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून त्यादरम्यान सुधारीत आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेण्याकरीता सुधारीत आकृतीबंधाचे प्रस्ताव शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक २९ जून,२०१७ नुसार तपासून व त्यानुसार कार्यवाही करुन तातडीने वित्त विभागास सादर करण्याकरीता आयुक्तालय कार्यालयाने उचित कार्यवाही करावी व त्याबाबतचा प्रस्ताव शासनास पाठवावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७०८१४४२०९३६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJENDRA VITTHAL KUDALE

Digitally signed by RAJENDRA VITTHAL KUDALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=b512f7ff8b758d60a4598c24a36386a4805881cbcea84410a43526338ca5896f, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=92FCD41179A2BA99BFFA75CBE0C90685A327C8ACC0593DB3D1CCAD3F24BA6315, cn=RAJENDRA VITTHAL KUDALE
Date: 2026.07.08 14:49:25 +05'30'

(रा. वि . कुडले)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई /नागपूर.
२. आयुक्त,आरोग्य सेवा तथा अभियान संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.

३. संचालक, आरोग्य सेवा-१, आरोग्य सेवा आयुक्तालय, आरोग्य भवन, मुंबई.
४. संचालक, आरोग्य सेवा-२, पुणे.
५. उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ,नागपूर.
६. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, गडचिरोली.
७. जिल्हा कोषागार अधिकारी,गडचिरोली.
८. वैद्यकीय अधिक्षक, स्त्री रुग्णालय, अहेरी जि. गडचिरोली.
९. वित्त विभाग (व्यय-१३), मंत्रालय, मुंबई.
१०. अवर सचिव/कार्यासन अधिकारी, (सेवा-१/सेवा-२/अर्थसंकल्प), सा.आ.वि. मंत्रालय,मुंबई.
११. निवडनस्ती (पासु-२)

परिशिष्ट- अ

(शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक:- अपदे-२०२५/प्र.क्र.३१८/ पासु-२, दि. ०८ जुलै, २०२६ सोबतचे परिशिष्ट-अ)

अ.क्र.	आरोग्य संस्थेचे नाव	पदनाम	वेतनसरंचना	अस्थायी पदांची संख्या
१	**स्त्री रुग्णालय, अहेरी जि. गडचिरोली**	वैद्यकीय अधिक्षक गट-अ	एस-२३ : ६७७००-२०८७००	०१
		वैद्यकीय अधिकारी गट-अ (स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र)	एस-२३ : ६७७००-२०८७००	०१
		वैद्यकीय अधिकारी गट-अ (बालरोग तज्ञ)	एस-२३ : ६७७००-२०८७००	०१
		वैद्यकीय अधिकारी गट-अ (बधिरीकरण तज्ञ)	एस-२३ : ६७७००-२०८७००	०१
		क्ष-किरण तंत्रज्ञ गट-अ	एस-२३ : ६७७००-२०८७००	०१
		बधिरीकरण तज्ञ गट-अ	एस-२० : ५६१००-१७७५००	०२
		वैद्यकीय अधिकारी गट-अ (बालरोग तज्ञ)	एस-२० : ५६१००-१७७५००	०२
		वैद्यकीय अधिकारी गट-अ (बालरोग तज्ञ)		०३
		वैद्यकीय अधिकारी गट-अ	एस-२० : ५६१००-१७७५००	०५
		सहायक अधिसेविका	एस-१५-४१८००-१३२३००	०१
		परिसेविका	एस-१४-३८६००-१२२८००	०५
		अधिपरीचारिका	एस-१३ : ३५४००-११२४००	०८
		बालरोगपरिचारिका	एस-१४-३८६००-१२२८००	०३
		रक्तपेढी तंत्रज्ञ	एस-१३-३५४००-११२४००	०१
		औषध निर्माण अधिकारी	एस-१०-२९२००-९२३००	०२
		भांडार तथा वस्त्रपाल	एस-०६-१९९००-६३२००	०१

		प्रशासकीय अधिकारी	एस-१५-४१८००-१३२३००	०१
		कार्यालयीन अधिक्षक	एस-१४-३८६००-१२२८००	०१
		वरिष्ठ लिपिक	एस-०८-२५५००-८११००	०१
		कनिष्ठ लिपिक तथा टंकलेखक	एस-०६-१९९००-६३२००	०१
एकुण अस्थायी पदे				**४२**